अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शनिवार, दि. १ नोव्हेंबर २०२५ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : ३३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

## फलटणच्या आत्महत्या प्रकरणाचा तपास 'एसआयटी'कडे

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आदेश**

✔ **मुंबई** : राज्यात गाजलेल्या फलटणच्या महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणाचा तपास आता स्पेशल इन्व्हेस्टिगेशन टीम अर्थात एसआयटीकडून करण्यात येणार आहे. या प्रकरणी एसआयटी स्थापन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या पोलीस महासंचालकांना शुक्रवारी दिले. महिला डॉक्टर आत्महत्येचा तपास हा एका महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालील एसआयटीकडून करण्यात येणार आहे.

काही दिवसांपूर्वी फलटणमधील उपजिल्हा रुग्णालयातील एका महिला डॉक्टरने आत्महत्या केली होती. या प्रकरणात तिने हातावर सुसाईड नोट लिहिल्याचे समोर आले या प्रकरणात भाजपचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकरांचे दोन पीए, पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने याच्यावर आरोप करण्यात आला. गोपाळ बदनेने आपल्यावर चार वेळा बलात्कार केल्याचा आरोप महिला डॉक्टरने केला. तसेच पोस्टमॉर्टम रिपोर्ट बदलण्यासाठी आपल्यावर वरिष्ठांचा आणि पोलिसांचा दबाव आल्याची तक्रारही तिने केली होती.

# 'एमपीएससी'वर फडकली सोलापूरची पताका

## विजय लमकणे राज्यात प्रथम : मोहोळ तालुक्यातील कोन्हेरी गावातील सुपुत्राच्या यशाने सोलापूरची मान उंचावली

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एम पीएससी) घेण्यात आलेल्या राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२४ चा निकाल जाहीर झाला आहे. मुख्य परीक्षा आणि मुलाखतींची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर गुरुवारी रात्री उशिरा हा निकाल प्रसिद्ध करण्यात आला. या निकालात सोलापूर जिल्ह्यातील विजय नागनाथ लमकणे यांनी राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे, तर हिमालय घोरपडे यांनी दुसरा क्रमांक मिळवला आहे. नागपूरची प्रगती जगताप हिने अनुसूचित जाती प्रवर्गातून राज्यात पहिला क्रमांक मिळवला आहे.सोलापूर जिल्ह्याच्या मोहोळ तालुक्यातील कोन्हेरी या गावचा सुपुत्र असलेल्या विजयने ही यशाची बाजी मारून राज्यात सोलापूर जिल्ह्याची मान उंचावल्याबद्दल शिक्षण क्षेत्रात आनंदाचा माहोल पसरला आहे. एमपीएससीने प्रसिद्ध केलेल्या प्रसिद्धिपत्रकानुसार सर्वसाधारण गुणवत्ता यादी तसेच पात्रता गुण जाहीर करण्यात आले आहेत.



विजय लमकणे

राज्यसेवा मुख्य परीक्षा एम पीएससीतर्फे २७ ते २९ मे २०२४ दरम्यान घेण्यात आली होती. या परीक्षेनंतर पात्र ठरलेल्या १,५१६ उमेदवारांची मुलाखत प्रक्रिया ३० ऑक्टोबरपर्यंत पार पडली. त्यानंतर आयोगाने रात्री उशिरा निकाल जाहीर केला. एकूण ७,९७० उमेदवार परीक्षेसाठी पात्र ठरले होते. त्यापैकी ७,७३२ उमेदवारांनीच मुख्य परीक्षेसाठी अर्ज सादर केला. विविध तांत्रिक कारणांमुळे काही उमेदवारांना अर्ज सादर करण्यात अडचणी आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर एमपीएससीने अर्जप्रणाली खुली ठेवत उर्वरित पात्र उमेदवारांना संधी दिली होती.

(पान ७ वर...)

### मोहोळ तालुक्यातील कोन्हेरी गावचा सुपुत्र

सोलापूरचा विजय नागनाथ लामकणे हा मूळचा सोलापूर जिल्ह्याच्या मोहोळ तालुक्यातील कोन्हेरी गावचा आहे.या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना विजय म्हणाले की, मी २०२३ मध्ये ही परीक्षा दिली होती, तेव्हा मला सहावा क्रमांक मिळाला होता. पण उपजिल्हाधिकारी व्हायचे स्वप्न असल्यामुळे मी पूर्ण प्रयत्न केले आणि यंदा राज्यात पहिला क्रमांक मिळवला. २०२१ पासून मी एसटीआय, दुय्यम निबंधक, गटविकास अधिकारी अशा विविध पदांवर काम करत आलो आहे. माझ्या स्ट्राँग पॉइंटवर मी लक्ष केंद्रित केले. डिस्क्रिप्टिव आणि मुलाखतीत अनुभव नव्हता, पण ऑब्जेक्टिव्ह परीक्षा चांगली झाली. २०२२ मध्ये एम पीएससी टॉपर विनायक पाटील यांचा मार्गदर्शन मी फॉलो केला. मर्यादित स्त्रोतांवर आणि कमाल रिव्हिजनवर काम केल्यामुळे हे यश मिळाले.अभ्यास किती वेळ करावा, हे महत्वाचे नाही. मी सुमारे सात ते आठ तास दररोज अभ्यास करत होतो. राज्यसेवेचा अभ्यास मी जॉब करत करत केला. आई–वडीलांचे संपूर्ण सहकार्य मिळाले, जे फार महत्वाचे होते. जिथे मी शिकलो, तेथे ते माझ्यासोबत होते.''

## हिपळेतील गवळ्याची गुणवंत लेक झाली उपजिल्हाधिकारी

### राज्यात मुलींमध्ये आरती जाधव पहिली

✔ दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी

नुकत्याच घोषित झालेल्या एमपीएससी परीक्षेच्या निकालात सोलापूरची आरती परमेश्वर जाधव ही राज्यात मुलींमध्ये पहिली आली आहे. तिने उपजिल्हाधिकारी पदाला गवसणी घातली आहे.



आरती जाधव

आरतीचे वडील परमेश्वर उर्फ वामन मालबा जाधव (मु. हिपळे,ता. द.सोलापूर) हे गवळी म्हणून दूध संकलन करून कुटुंबाचा चरितार्थ चालवतात. परमेश्वर हे वामन गवळी म्हणून ओळखले जातात. त्यांनी अत्यंत संघर्ष करुन १९९० दशकांत वाणिज्य शाखेची पदवी मिळवली आणि एमपीएससीसाठी प्रयत्न केले पण वामन जाधव हे एमपीएससी परीक्षेत केवळ एका मार्काने अपयशी ठरले होते. तेव्हा त्यांनी दूध व्यवसाय करून आपले स्वप्न आपल्या पुढच्या पिढीत रुजवले. भाऊ महावीर मालबा जाधव याला आधी पीएसआय केले. त्यानंतर मुलगा विनायक वामन जाधव (बीडीओ) याला एमपीएससीत यशस्वी होण्यासाठी पाठबळ दिले अन् आता मुलगी आरतीने उपजिल्हाधिकारी पोस्ट काढून आपल्या वडिलांच्या अपूर्ण स्वप्नाला यशाचे कोंदण लावले. ती सध्या नागपूरला मुख्याधिकारी म्हणून प्रशिक्षण पूर्ण करत आहे.

## लालमातीत कुस्तीचे डावपेच शिकलेला पैलवान 'तस्करी'च्या डावपेचात : कुस्तीची अनेक मैदानं मारलेला 'सिंकदर' अडकला 'खाकी'वर्दीच्या डावात

# धक्कादायक ! मोहोळचा महाराष्ट्र केसरी सिंकदर शेख बनावट पिस्तूल विक्रीच्या रॅकेटमध्ये! अवैध तस्करीप्रकरणी पोलिसांकडून बेड्या; अवघे कुस्तीविश्व हादरले!!

✔ सोलापूर-कोल्हापूर/खास प्रतिनिधी

**महाराष्ट्र केसरी आणि आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू पदकाचा मानकरी प्रसिद्ध मल्ल सिंकदर शेख (रा. मोहोळ, जि. सोलापूर) चक्क बनावट पिस्तूल विक्रीच्या रॅकेटमध्ये सहभागी असल्याची खळबळजनक आणि तितकीच धक्कायदायक माहिती समोर आली आहे. याप्रकरणी त्याच्या हातात बेड्या पडल्या आहेत. चौकशीअंती तो राजस्थानमधील कुख्यात विक्रात ऊर्फ पपला गुर्जर बनावट शस्त्री विक्री टोळीच्या नेटवर्किंगमध्ये असल्याचे उघड झाले आहे. लालमातीच्या आखाड्यात कुस्तीचे डावपेच शिकलेला पैलवान सिंकदर शेख हा बनावट पिस्तूल विक्रीचे डावपेच शिकला खरा पण अखेर कुस्तीची अनेक मैदानं मारुन वाहवा मिळवलेला 'सिंकदर' काळ्या धंद्याच्या प्रकरणात पंजाब 'खाकी'वर्दीच्या अटकेच्या डावात अडकला. लोकप्रियतेच्या शिखरावर गेलेल्या सिंकदरनं मिळवलेली किर्ती,नाव, प्रसिद्धी असं सगळंचं काही खल्लास झालं. सिंकदर शेखच्या या घटनेनं आख्खं कुस्तीविश्व हादरलं आहे.**

(पान ७ वर...)

- राजस्थानमधील कुख्यात टोळीच्या नेटवर्किंगमध्ये असल्याचे उघड
- टोळीचा पर्दाफाश करताना आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू पदकाचा मानकरी जेरबंद
- पंजाब पोलिसांकडून अटक, पाच पिस्तूलांसह काडतुसे जप्त

### पपला गुर्जर टोळीशी थेट संबंध

पंजाबचे एसएसपी हरमन हंस यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, अटक करण्यात आलेले आरोपी हरियाणा आणि राजस्थानात सक्रिय असलेल्या विक्रम ऊर्फ पपला गुर्जर टोळीशी थेट संबंधित आहेत. आरोपी उत्तर प्रदेशातून शस्त्रे आणून ती पंजाब आणि परिसरात पुरवत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली. दरम्यान यामध्ये तिघेजण गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले आहेत तर महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्याच्या सिकंदर शेखची गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासण्यासाठी महाराष्ट्र पोलिसांशी आम्ही संपर्क साधल्याची माहिती हंस यांनी दिली.





### एअरपोर्ट चौकातून तिघांना अटक


२४ ऑक्टोबर रोजी दानवीर आणि त्याचा साथीदार बंटी एक्सयूव्ही गाडीत दोन शस्त्रे घेऊन मोहालीत आले होते. ही शस्त्रे सिकंदर शेखकडे देण्याचे ठरले होते, तर सिकंदरने ती नयागावातील कृष्ण उर्फ हैप्पी याला पुरवायची होती. पोलिसांनी एअरपोर्ट चौकातून तिघांना अटक केली. त्यानंतर मिळालेल्या माहितीवरून २६ ऑक्टोबर रोजी कृष्ण कुमार उर्फ हैप्पी यालाही अटक करण्यात आली आणि त्याच्याकडून आणखी तीन पिस्तूल जप्त करण्यात आली.

### ज्या हातांनी आखाड्यात विजयाची खुण दाखवली तेच हात काळ्या धंद्यात गेले, हातात पडल्या बेड्या

कुस्तीमध्ये करिअर केलेल्या सिंकदर शेख यांनं लाल मातीमधील कुस्त्यांची अनेक मैदानं मारली. कित्येकांना चितपट केलं. अस्मान दाखवलं. आखाड्यात प्रतिस्पर्धी पैलवानावर विजय मिळवताना हालग्यांच्या कडकडात, टाळ्या आणि शिट्ट्यांच्या कौतुकात सिंकदर शेख याने प्रत्येक वेळी दोन्ही हात उंचावून विजयाची खूण दाखवली. मैदान मारल्याचं दाखवून दिलं. त्याच सिंकदरचे हातात काळ्या धंद्यात गुंतले आणि त्याचा हातात बेड्या पडल्या.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



यातून एवढी अचूक कागदपत्रे मिळाली !

संगम श्री डे
247-39-469

संगम श्री नाईट
689-30-370

कल्याण
379-90-127

मुंबई
149-47-890

# दहशत माजवल्याने वैराग हादरले...

## कोयता घेवून बेधडक दुकानात शिरला, खलास करेन, व्यापाऱ्याला धमकावला | शिताफिने पकडून एकाची शहरातून काढली धिंड

✔ बार्शी/प्रतिनिधी

जुन्या गुन्ह्यामध्ये माझे नाव का घेतले म्हणून भर दिवसा वैरागमधील एका दुकानात जाऊन कोयत्यांनी दहशत माजवत जीवे ठार मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी वैराग पोलीस ठाण्यात एकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या गुन्ह्यात कोयता वापरून दहशत माजवल्याने भविष्यातील धोके ओळखून वैराग पोलिसांनी आरोपींची मुख्य रस्त्यावरून धिंड काढून त्याला अद्दल घडवली.पोलिसांच्या या कामगिरीने सर्वसामान्यांना दिलासा मिळाला आहे.

याबाबत वैराग पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, वैराग शहरातील पंचशील नगर येथे फिर्यादी सुरज भोसले यांचे भोसले ट्रेडर्स किराणा मालाचे दुकान आहे.या दुकानांमध्ये एक वर्षांपूर्वी तुळशीदास नगर येथील संतनाथ सहकारी साखर कारखान्यावरून तेथील विद्यमान सरपंचांचे दीर अजित पाटील यांना मारहाण झाली होती. या प्रकरणी आयाज शेख, युवराज प्रबळकर,विजय उबाळे व प्रतीक भोसले यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी माझे नाव का घेतले? असे म्हणत आयाज शेख याने कोयता घेऊन भोसले ट्रेडर्स मध्ये गुरूवारी सायंकाळी ६ वाजता दुकानात जात दहशत माजवण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्याने काउंटरवर असलेले कॅडबरी फ्रिज फोडून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. दुकानाच्या काउंटरवरील कॅटरिंगसाठी ठेवलेला काचेच्या फ्रिजवर कोयत्याचे जोरदार वार केले. अशपाक याच्या या हल्ल्यामुळे किराणा

(पान ७ वर...)



बार्शी : दहशत माजवणाऱ्यावर कारवाई करताना पोलीस अधिकारी.

### दहशत माजवली

दुकानात गिऱ्हाईक चालू असताना ग्राहकाला देखील शिव्या दिल्या, ३०७ च्या जुन्या गुन्ह्यात नाव का घेतले म्हणत जीवे ठार मारण्याची धमकी देत कोयत्याने कॅडबरीचा फ्रिज फोडत दहशत माजवली असे सुरज भोसले यांनी सांगितले.

### यापुढे खपवून घेतले जाणार नाही

यापूर्वी संबंधित आरोपीवर ३०७ चा गंभीर गुन्हा दाखल असून वैराग पोलीस ठाण्याच्या हद्दीत अशाप्रकारे दहशत माजवण्याचा कुणीही प्रयत्न केला तर खपवून घेतले जाणार नाही. असा इशारा वैराग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांनी दिला आहे.

## महिलेचा शारीरिक-मानसिक छळ; फायनान्सच्या कर्मचाऱ्यांवर गुन्हा

✔ सोलापूर/प्रतिनिधी

राज्यात एकीकडे फलटण महिला डॉक्टरचे प्रकरण गाजत असताना इतर ठिकाणच्या महिलाही सुरक्षित नसल्याचे अनेक घटनांमधून समोर येत आहे. सोलापुरात अशीच एक घटना घडली.

बेकायदेशीर कर्ज मंजूर करण्यास नकार दिल्याने महिला कर्मचाऱ्याचा शारीरिक आणि मानसिक छळ करण्यात आल्याची घटना घडली. या प्रकरणी सोलापुरातील किश्त फायनान्स कंपनीच्या कार्यालयातील निम्याहून अधिक कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोलापुरातील या पीडित महिलेने तक्रार केल्यानंतर कंपनीने त्याची दखल तर घेतलीच नाही, उलट पीडितेलाच 'अशा मुली कॅरेक्टरलेस असतात' अशी शेरेबाजी करणाऱ्या कंपनीच्या एचआरवर देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे.एकूण १० आरोपींच्या विरोधात जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### महिलेसाठी स्वतंत्र वॉशरुम नव्हते

सोलापुरातील किश्त फायनान्स कंपनीमध्ये एकूण १४ व्यक्ती कामाला असून केवळ एकच महिला कर्मचारी कामाला होती. त्यामुळे तिच्यासाठी स्वतंत्र वॉशरूम देखील व्यवस्था करण्यात आलेली नव्हती. उलट पीडिता वॉशरूमचा वापर करायला जाताना आरोपींनी तिच्यावर अश्लील शेरेबाजी करत छेड काढली.